INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या कादंबऱ्यातील स्त्रीदर्शन

प्रा. विशाखा एम. लोहकरे,
कार्यकारी प्राचार्य,
मारिया आर्ट्स अँड सायन्स कॉलेज देवळी, जिल्हा-वर्धा
vishakhalohakare54@gmail.com

**प्रस्तावना :**

कादंबरी कविता आणि समीक्षा अशा साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये लेखन करणाऱ्या मुक्तिबोधांच्या साहित्याने अनेक समीक्षकांचे लक्ष वेधून घेतले, प्रशंसा संपादन केली आधुनिक मराठी साहित्याच्या परंपरेमध्ये एक स्वतंत्र आणि प्रतिष्ठेचे स्थान मिळविले एकीकडे दि. के. बेडेकर, त्र्यं. वि. सरदेशमुख, वि. स. जोग, भालचंद्र फडके अशा जानकार समीक्षकांच्या वेधविषय बनणारे मुक्तिबोधांचे साहित्य समांतरपणे रसिक-वाचकालाही सातत्याने आवडत आले. विविध सन्मान, पुरस्कार यांच्या रूपाने मुक्तिबोधाच्या साहित्याला एक व्यापक अनुमतीही मिळाली.

शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी जीवनाच्या अखेरपर्यंत काव्य, समीक्षा या दोन्ही क्षेत्रात विपुल निर्मिती केली. कादंबऱ्या मात्र तीनच लिहिल्या. त्यांच्या काव्य आणि समीक्षा लेखनाची समीक्षकांकडून जेवढी चर्चा झाली त्यामानाने कादंबरीची समीक्षा कमीच झालेली दिसून येते, परंतु प्रसिद्ध समीक्षक श्री. रा. भा. पाटणकर यांनी मुक्तिबोधाच्या संपूर्ण साहित्याची समीक्षा करताना त्यांच्या 'मुक्तिबोधांचे साहित्य' या ग्रंथात कादंबरीच्या समीक्षेला अग्रक्रम दिलेला आहे. यावरून त्यांच्या कादंबरीची मौलिकता आपल्या लक्षात येते.

**विषय प्रतिपादन :**

पारंपारिक स्वरूपापेक्षा एकदम भिन्न असे मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यांचे स्वरूप आहे. आशय आणि अभिव्यक्ती त्या दोन्ही दृष्टीने परंपरेपेक्षा भिन्नता त्यांच्या कादंबऱ्यात आहे. 'क्षिप्रा' कादंबरी सोडली तर 'सरहद्द' आणि 'जन हे वोळतू जेथे' दोन्ही कादंबऱ्या वेगवेगळ्या वाचता येत नाही. तीनही कादंबऱ्या मिळून कादंबरीतील आशय, व्यक्ती, घटना, प्रसंग यांची सुसंगती लागू शकते. 'क्षिप्रा' 'सरहद्द' आणि 'जन हे वोळतू जेथे' या त्रिखंडात्मक कादंबऱ्या होय. या तीनही कादंबऱ्या म्हणजे विश्वास किंवा बिशू या एका संवेदनाशील तरुणाच्या आयुष्याचे तीन टप्पे होय. या टप्प्यांवरून बिशूच्या समग्र विकासाचा वर चढत जाणारा आलेख आहे. या तीन कादंबऱ्या म्हणजे बिशूला समाजरुपी समष्टीकडे नेणारा प्रवाह आहे.

शरच्चंद्र मुक्तिबोध यांच्या 'क्षिप्रा', 'सरहद्द' आणि 'जन हे वोळतू जेथे' या तीनही कादंबऱ्यांतून आपल्याला अनेक माणसे भेटतात आणि जीवनाचे विविध प्रकार, आकार, वृत्ती, वैशिष्ट्ये त्यांच्या रूपाने दिसू लागतात. या कादंबऱ्यांमध्ये ज्याप्रमाणे पुरुषपात्रे आहेत त्याचप्रमाणे काही स्त्रीपात्रांची योजनाही मुक्तिबोधांनी केलेली आहे. अर्थात स्त्रीजागृती किंवा स्त्रीसुधारणा हा मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यांचा विषय नव्हेच एका नाजूक, हळव्या, क्षिप्रेच्या काठाने वावरणाऱ्या बिशूचा विकास होण्याच्या प्रक्रियेमध्ये या त्रिदल कादंबरीतून अनेक पात्रांची ओळख मुक्तीबोध करून देतात. या सर्व पात्रांच्या कमी-अधिक प्रभावातून बिशूचे व्यक्तिमत्व साकार झालेले आहे. बिशू उर्फ विश्वास हे मुक्तिबोधांच्या त्रिखंडात्मक कादंबरीतील मध्यवर्ती पात्र असले तरी बिशू

इतकेच प्रयोजनाचे सामर्थ्य प्रत्येक पात्रांच्या ठिकाणी आहे. बिशू हा केवळ नाममात्र केंद्रबिंदू आहे आणि त्यामुळेच मुक्तिबोधांच्या कादंबरी विश्वासून कोणतेही एक पात्र बाजूला केले तरी संपूर्णच्या संपूर्ण व्यवस्था एका क्षणात कोलमडून पडेल इतके प्रत्येक पात्र बलशाली आहे. मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यातील पात्रांविषयी त्र्यं. वि. सरदेशमुख म्हणतात, ''मध्यमवर्गाच्या अंत:स्तरावर जगणाऱ्या-मरणाऱ्या पांढरपेशा स्त्री-पुरुषांची ही कहाणी भयावह वास्तवालाही कल्याणकारी जीवनाची आशावादी स्वप्ने उरात धरून झगडणाऱ्यांची, जगण्याचे प्रयोजन सर्वजणांच्या कल्याणाशी जोजवे आणि त्या दिशेने सामाजिक परिवर्तनाचे मोर्चे, बांधावे हा ध्यास बाळगणारी जिवंत पात्रे मुक्तीबोधानी निर्माण केली.''

मुक्तिबोधांच्या त्रिखंडात्मक कादंबरीमध्ये जी प्रमुख स्त्रीपात्रे आहेत अर्थात या तिन्ही कादंबऱ्यांमधून वावरणारी स्त्रीपात्रे काही मराठी कादंबरीविश्वात निर्माण झालेल्या स्त्रीपात्रांपैकी काही खूप निराळी नाहीत. या कादंबऱ्यातील स्त्रीसारखी स्त्री रंगविणारे इतरही कादंबरीकार आहेत. असे असले तरी मुक्तिबोधांच्या कादंबरीतील स्त्रिया फडकेकालीन कादंबरीतील स्त्रीपेक्षा खूपच वेगळ्या आहेत.

स्त्रियांच्या कर्तृत्वशीलतेवर मुक्तिबोधांचा अतिशय विश्वास आहे. दुसऱ्यांच्या थापास, दिखाऊपणा बळी पडलेल्या फसलेल्या स्त्रिया त्यांच्या कादंबरीत कुठेही आढळून येत नाहीत. संकटांनी हैराण न होता अत्यंत धीरोदात्तपणाने वागून आपला मार्ग काढताना या स्त्रिया दिसतात. या स्त्रीसृष्टीत दुबळेपणा, गरीबपणा यांचा अभाव आहे.

परिस्थितीच्या आघातांनी या स्त्रिया निराश होत नाहीत, तर वारंवार कोसळणाऱ्या आघातांनी त्यांच्या कणखरपणा येतो त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये आयुष्यभर व्रत म्हणून तिची पूजा करणाऱ्या कणखर रमाबाई आहेत, त्याचप्रमाणे जीवनाच्या सर्व भयान रूपांच्या स्वीकार करून जीवनाचे सूत्र बळकट करणाऱ्या निर्मलामावशीही आहेत. त्यात जशी निरागस कमळ आहे तशीच उमादाने हसणारी, कपडे पेटवून घेणारी सुमाही आहे. मुक्तिबोधांच्या या जगात आयुष्यभर केवळ अपेक्षाभंगाचे दुःख घेऊन जगणाऱ्या गीताबाईही आहेत. तसेच केवळ सरहद मध्ये थोडाच वेळ दिसणारे पात्र म्हणजे अक्का अक्काही प्रथमपासूनच रुग्णाईत आहे. तिला वाचक जेव्हा प्रथम भेटतो तेव्हा ती अंथरुणाला खिळलेली आहे, बाबा तुम्ही तर काय आहे ती शेवटपर्यंत तशीच राहते, त्यातच तिचा शेवट होतो. यातील बहुतेक महत्त्वाची पात्रे दारिद्र्याशी झगडत आहेत. या स्त्रीपात्रांमध्ये प्रमुख पात्र आहे रमाबाई. रमाबाईचे व्यक्तिदर्शन घडवताना लेखक रमाबाईच्या रूपाने एका संस्कारशील भारतीय आदर्श स्त्री प्रतिमा आपल्या डोळ्यासमोर उभी करतात.

बिशुवर एकट्या बापूंचेच संस्कार झालेले नाहीत, तितकेच खोलवर जाणारे संस्कार रमाबाईचेही आहेत हे दोन संस्कार झाल्यामुळेच बिशूच्या मानसिक प्रवासाला व्यक्तित्वाच्या घडणीला घडणीला विवक्षित दिशा मिळते. रमाबाईच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे दर्शन घडवितांना लेखक फ्लॅशबॅकसच्या मार्गाने वाचकांना बापू-रमा यांच्या बालपणापर्यंत घडून जातात, व यातूनच रमाबाईंच्या रूपाने आपल्याला एका संपूर्ण जीवन प्रकाराचे दर्शन घडते. रमा ही श्रीमंत घरातली मुलगी, तिचे लग्न गरीब घरातल्या नारायणशी (बापू) ठरते. बापू गरीब असले तरी ती त्यांचा सर्वार्थाने स्वीकार करते. जन्मभर गरीबीचे व्रत स्वीकारते. विशिष्ट मूल्ये जीवापाड जपते. बापू- रमाबाई हे बालपणी एकत्र खेळले असले तरी तिचे लग्न ठरविलेले नाही. त्या काळात असे घडणे असंभवनीय होते. इतके मात्र म्हणता येईल की तिने या लग्नाच्या व त्याचबरोबर येणाऱ्या एका जीवन प्रकाराचा

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

स्वीकार अनिच्छेने केलेलं नाही. त्यांचे लग्न जरी वडीलधाऱ्या मंडळींनी ठरविलेले असले तरी त्यांचा एकमेकाविषयीचा जिव्हाळा बापूंची पूर्णपणे समरस होण्यासाठी रमाबाईंनी स्वीकारलेला दारिद्र्यांचा वसा या सर्व गोष्टी पाहता बिकट अशा जीवन प्रकाराचा स्वीकार स्वतः रमाबाईनीच केलेला आहे.

रमाबाई व्रतस्थ आहेत, सात्विक व धार्मिक वृत्तीच्या आहेत, तसेच त्यांना वास्तव्याचे चांगले भानही आहे. रमाबाईंच्या व्यवहारदक्षतेचे उदाहरण देताना रा.भा. पाटणकर म्हणतात, रमाबाई व्रतस्थ आहेत तशाच त्या वास्तवाचे चांगले भान असलेल्या व्यवहारादक्ष अशी संसारी स्त्री ही आहे. दारिद्र्याचे त्यांना स्वतःला जे चटके बसतात. त्यांच्याविषयी त्यांची तक्रार नाही. पण आपल्याला तीन मुले आहेत त्यांना अन्न वस्त्र निवारा मिळाला पाहिजे, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे. मुलगी चांगल्या घरी पडली पाहिजे, सर्वांना ताट मानेने जगता आले पाहिजे. याबद्दल मात्र त्या दक्ष आहेत, तटपुंज्या मिळकतीत हे सर्व साधायचे म्हणजे वेळप्रसंगी कटूता निर्माण होईल असे बोलावे लागते, व्यवहाराच्या चार गोष्टी जवळच्यानाही सांगाव्या लागतात हे त्या ओळखून आहेत.

आजच्या जगालाच ईश्वरी जग मानून त्याचा स्वीकार करणाऱ्या बापूंपेक्षा ईश्वरांवर भरवसा असणाऱ्या पण ईश्वराइतकाच मानवी प्रयत्नांवर विश्वास ठेवणाऱ्या ईश्वरी न्यायाचे जग अजून स्थापित झालेले नाही. ते अजून यायचे आहे त्यासाठी सतवृत्ती माणसांना मानवी पातळीवर निकराने प्रयत्न करावे लागणार आहेत असे मानणाऱ्या आणि त्याचप्रमाणे वागणाऱ्या रमाबाई वास्तवाबद्दलही जागरूक आहेत. सात्विक व धार्मिक वृत्ती असली तरी कणखरपणाही त्यांच्या ठिकाणी आहे. आयुष्यात आलेल्या अनेक बऱ्या-वाईट अनुभवांनी त्या जशा स्थितप्रज्ञवृत्तीने राहतात तेवढाच कमालीचा सोशिकपणाही त्यांच्या जवळ आहे.

मुक्तिबोधांच्या त्रिखंडात्मक कादंबरीतील कमळ हे महत्त्वाचे पात्र! कमळ प्रत्यक्षपणे बऱ्याच मोठ्या प्रमाणात सरहद्द मध्ये उपस्थित आहे. त्यामानाने बऱ्याच कमी प्रमाणात ती 'जन हे वेळतू'मध्ये आढळते पण क्षिप्रा मध्ये ती अजिबात नाही. कमळ म्हणजे एक मुक्त आनंदाचे जीवन स्वीकाराचे प्रतिक होय. ती मावशीच्या घरातल्या सुखवस्तू वातावरणाशी एकरूप झाली आहे. सुरुवातीला अनाथ असलेली कमळ अगदी लहानपणी मावशीकडे आश्रित म्हणून येते, आणि इथल्याच लोकांची मते व मूल्ये स्वीकारते.

कमळ ही चकचकीत, सुखमय जगाची प्रतिनिधी आहे असा समज झाल्याने बिशू तिच्या प्रत्येक बोलण्याचालण्याकडे संशयाने पाहतो. ती वयाने त्याच्या एवढी किंवा थोडी लहान असली तरीही बिशूपेक्षा ती जास्त प्रगल्भ व समजूतदार आहे. सुरुवातीला मावशीप्रमाणे तिलाही बिशूचे वर्तन कळत नाही. इंदूरच्या नव्या अनोळखी जगात तो भांबावल्यासारखा झाला आहे हे मात्र तिच्या लक्षात आले आहे आणि म्हणूनच या जगात त्याला समरस करण्याची जबाबदारी ती स्वतःहून आपल्यावर घेते. ती स्वभावत:च मनमिळावू, प्रेमळ, समजूतदार असल्याने तिला या कामात बऱ्याच प्रमाणात यशही येते.

कमळच बिशुवर निर्मळ प्रेम आहे. बिशूच्या मार्गदर्शनाखाली सुखासीनतेच्या जग बाहेरील जग पाहण्याची क्षमता आहे ती दाखविली आहे. कमळ आपल्यापेक्षा जास्त प्रगल्भ आहे हे बिशुलादेखील पटते. बिशुने दुर्लक्षिलेल्या मूल्यस्थलांची जाणीव त्याला कमळ करून देते.

यानंतर मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यातील एक पात्र म्हणजे सरहद्द मधली दुःखाने पोळलेली, स्वेच्छेने एकाकीपणा स्वीकारलेली निर्मलामावशी होय. बिशूला जीवापाड जपणारी जी माणसे आहेत त्यात इंदूरच्या

निर्मलामावशी होय. मावशीचे जीवन एक अर्थाने यशस्वी झालेले आहे. परंतु तरीही त्या समाधानी नाहीत. त्यांना कुटुंब सुख कधीच मिळाले नाही. लहानपणी त्या स्वतःच्या सौंदर्याच्या तोऱ्यात असल्यामुळे आत्मकेंद्रितेतून बाहेर पडल्या नाहीत. लग्नानंतर सासरहून पळून जाईपर्यंत त्या एका भयस्वप्नात एकाकी अवस्थेत दिवस काढीत होत्या. त्यांचा नवरा असून नसल्यासारखाच होता पुढे त्यांना रमाई-बापूंनी जरी नाही तरी डॉ. जोशांनी आधार दिला. त्या नर्स होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या, यशस्वी झाल्या, यांच्या भोवती स्नेहांचे वर्तुळ जमले पण त्यांना हवे असलेले कुटुंब सुख मात्र मिळाले नाही. त्यांनी कमळ व बिशू यांना जवळ करण्याचा प्रयत्न केला. कमळ च्या बाबतीत त्यांना यश आले देखील पण बिशूकडून त्यांना हवा तो प्रतिसाद मिळाला नाही.

रमाबाई परिस्थिती-विरुद्ध संघर्ष देणारी जसा आयुष्यभर दारिद्र्याशी लढा दिला, निर्मला मावशी विपरीत परिस्थिती विरुद्ध नेत्याने उभ्या राहिल्या, त्याचप्रमाणे मुक्तिबोधांच्या दारिद्र्याशी निर्धाराणे झुंजणारी गीताबाई सुद्धा आहे. मुक्तिबोधांच्या कादंबरी विश्वातील गीताबाई हे तसे गौणच पात्र! एका सामान्य संसारी स्त्रीच्या अपेक्षा बाळगणाऱ्या गीताबाईच्या संसारात भेसळपणाचे अधिक गडद रंग आहेत. साध्या सुखाच्या मागे धावता धावता त्यांचे अवघे आयुष्य निघून जात आहे, पण सुखाचा धागा मात्र त्यांना अजूनही गवतला नाही. गीताबाईंची सर्व धडपड क्षणाक्षणाला परिस्थितीशी झगडाव्या लागणाऱ्या वृत्तीबद्दल प्रा. मुक्तिबोध म्हणतात. ‘‘मध्यमवर्गीय घरकुल टिकवू पाहणारी गीताबाई जिवाच्या आकांताने झुंजत असूनही राजाच्या रूपाने व नानाच्या रूपाने तिच्या संसाराला मोठाली खिंडारे पडतात व कनिष्ठ मध्यम वर्गातही ती पाय रोवून राहू शकत नाही.’’

सुमा, प्रेमळ, सुंदर, सोशिक, हळव्या लोकांना हेलावून सोडील असे मुक्तिबोधांच्या कादंबरीतील एक पात्र. मुक्तिबोधांच्या कादंबरीविश्वात या पात्राला फार महत्त्वाचे स्थान उरले तरी कादंबरीच्या सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत ती कादंबऱ्यांमध्ये वावरते आहे. सुमा ही बापू-रमाबाई यांची मुलगी आणि बिशूची थोरली बहीण सुमा वडिलांवर गेलेली. गोरीपान, गोल तोंड, चित्रासारखे नाक डोळे! गरिबांच्या घरी नक्षत्रासारखी तळपते ती!

सुमा शेजारी पाटावर बसायची नि गोड गाणी म्हणायची. स्वयंपाक घरातून तिचं गाणं ऐकू येत आहे,

मुरली तुझी गोड कृष्णा
बन्सी तुझी गोड रे.....

सुमाच गाणं मनावर अंगाई गीत गायचं नीजेची फुलं अमृतात घोळवून पापण्यांवर त्यांचा चंदन स्पर्श व्हायचा नी डोळे झोपेने जड व्हायचे. आईचं काम संपेपावतर सुमाच्या गळयातून निघालेलं ते गोड गाणं असंच.... सुमाच्या अंत:करणातल्या उर्मी उसळून येत असल्या तरी तिला आपल्या कुटुंबाच्या परिस्थितीची जाणीव आहे. खरे पाहता, हसायचे, बागळायचे झिम्मा खेळण्याचे तिचे वय परंतु तिच्यासमोर सतत बापूंचा चिंताग्रस्त चेहऱ्यावर आईची ओढलेली मुद्रा दिसू लागते. घरच्या ओढाताणीमुळे सुमा आपले बालपणच जणू हरवून बसली होती. अकाली प्रौढ झालेली, परिस्थितीने पोळलेली सतत चिंताग्रस्त व उदास अशीच सुमाची प्रतिमा संपूर्ण कादंबरीभर दिसते.

बापू-रमाबाई या दोघांचाही संस्कार झालेली जीवनातली अनेकविध अनुभवांनी संपन्न झालेली सुमा स्वतःच्या व्यक्तित्वावर निखारा ठेवते आणि लग्न करून घराबाहेर पडते. जमेल तेव्हा वीरकर कुटुंबाला मदत करते.

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

तात्पर्य मुक्तिबोधांच्या कादंबरी विश्वातील बहुतेक स्त्रीपात्रे ही दारिद्र्याशी झुंजणारी परिस्थितीने पोळलेली आहेत. या अगतिक दारिद्र्यामुळे झालेल्या स्त्रिया मुक्तिबोधांच्या कादंबरीमध्ये आहेत. या स्त्री पात्रांविषयी डॉ. आशा सावदेकर म्हणतात. "समाजाने दिलेल्या अगतिकतेने स्त्रीजीवनाला लागलेली ओहोटी आहे असे मुक्तिबोध टिपतात. प्रेम करून व्यवहारी जगाच्या दृष्टीने कलंकिता झालेली सुमा प्रत्यक्षात जळून मरता आले नाही म्हणून बीजवराला पत्करून जीवन संपवूनच घेते. अक्का अवेळी मृत्युप्राश पत्करते, कारण तिथेच दारिद्रय, बापाचे नाकर्तेपण, आईचा त्रागा यातून शोषणात संपलेले जीवन कमळ मावशीच्या आश्रयाने जगता जगता जीवनच चौकटीत बद्ध करून घेते... बापूरमाबाई सारखे नैतिक जीवन जगले तरी जीवनात अमुक मिळेल अशी शाश्वती नाही, गीताबाईचा त्रागा... मावशीच्या इस्त्रीच्या जगात जिव्हाळा नाही...... मावशी कोरडीपणाच्या पिंजऱ्यात अडकली आहे."

**समारोप**

कादंबऱ्यातील स्त्रियांचे व्यक्तिदर्शन घडवताना मुक्तिबोधांचा स्त्रीविषयक दृष्टिकोनही व्यक्त होतो. विपरीत परिस्थितीमुळे भयाण दारिद्रयामुळे होणारी स्त्रियांची अगतिकता मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यातून आपल्याला दिसते , पण केवळ स्त्रियांची अगतिकता दाखविणे हा मुक्तिबोधांच्या कादंबऱ्याचा हेतू नव्हे. मुक्तिबोध हे कोणत्यातरी अर्थाने मार्क्सवादी होते हे जर मान्य केले तर भांडवलशाहीच्या विकासाबरोबर विशिष्ट प्रकारचे उत्पादन संबंध अस्तित्वात असल्याने समाजाचे झपाट्याने दारिद्रयकरण होते. हे मुक्तिबोधांना आपल्या कादंबऱ्यांमधून दाखवायचे आहे आणि हे दाखवण्याकरिताच त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये बापू-रमाबाई, नाना-गीताबाई, निर्मलामावशी, वामनराव इत्यादी कुटुंबाची निर्मिती केली. वामनरावांचा अपवाद वगळता प्रत्येकच कुटुंबामध्ये स्त्रिया आहेत आणि त्या अनुषंगानेच या स्त्रियांचा दारिद्र्याशी चाललेला संघर्षही आहे. रमाबाई, गीताबाई, निर्मलामावशी, वामनराव इत्यादी कुटुंबांची निर्मिती केली. वामनरावांचा अपवाद वगळता प्रत्येकच कुटुंबामध्ये स्त्रिया आहेत आणि त्या अनुषंगाने आपल्या कुटुंबाकरिता या स्त्रियांचा दारिद्र्याशी चाललेला संघर्षही आहे. यामध्ये रमाबाई, गीताबाई, निर्मलामावशी या प्रौढ स्त्रिया आहेत, तर कमळ, सुम्मा, अक्का ज्या तरुण मुलींनी आहेत सर्वच्या सर्वच परिस्थितीने पोळलेल्या आहेत. मुक्तिबोधांच्या कादंबऱ्यातील सर्व स्त्रीपात्रे दारिद्र्याने दुःखाने पिचलेली आहेत. कादंबऱ्यातील जवळ-जवळ सर्वानभोवतीची समान परिस्थिती म्हणजे दारिद्र्य बहुतेकांच्या दारिद्र्याशी सतत झगडा चालू तरी आहे, किंवा नुकताच संपलेला आहे, पण इथे एक गोष्ट मात्र आपण नमूद केली पाहिजे व ती म्हणजे या लोकांचा दारिद्र्याची झगडा म्हणजे नुसता अन्न वस्त्र निवारण त्यांच्यासाठी केलेला झगडा नव्हे. झगडणाऱ्या व्यक्तींनी काही मूल्ये जपली आहेत. विशिष्ट जीवन प्रकारात ती साकार करण्याचा प्रयत्न केला आहे. या जीवन प्रकारांवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे. या जीवन प्रकारांवर आक्रमण करणाऱ्या शक्ती विरुद्ध हे लोक झगडत आहेत. त्यांना नुसते कसे बसे जगायचे नाही, त्यांना मानाने जगायचे आहे. स्वतः ठरविलेली ध्येय गाठावयाची आहेत. इतर कोणाची तरी साधने म्हणून नव्हे तर स्वतः साध्ये म्हणून जीवन व्यतीत करायचे आहे या पात्रांनी जपलेल्या विशिष्ट जीवन मूल्यांमुळेच प्रत्येकाच्या दारिद्रयाला दुःखाला विविध रूप प्राप्त झालेले दिसून येते.

INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

**संदर्भ :**

१) मुक्तिबोध शरच्चंद्र, (१९६९)'जन हे वोळतू' मौज प्रकाशन, मुबई

२) मुक्तिबोध शरच्चंद्र, (१९६१), 'सरहद्द' मौज प्रकाशन, मुंबई

३) मुक्तिबोध शरच्चंद्र, (१९८६),'क्षिप्रा' मौज प्रकाशन, मुंबई

४) ठेंगडी, न. बा., (१९८५), 'शरच्चंद्र मुक्तिबोधांच्या कादंबऱ्या' समुचित, एमेजू

५) पाटणकर, रा. भा. (१९८६), 'मुक्तिबोधांचे साहित्य मौज' प्रकाशन, मुबई

६) बेडेकर, दी.के. (१९८७), 'मुक्तिबोधांची त्रिदल कादंबरी', विचार यात्रा प्रकाशन

७) सावदेकर, आशा (१९९३), 'मुक्तिबोधांची बिल्ब कादंबरी', जाफेमा प्रकाशन

८) कुलकर्णी मदन (१९८४), 'मराठी प्रादेशिक कादंबरी तंत्र आणि स्वरूप', मंगेश प्रकाशन, नागपूर

९) देशमुख अरुणा (१९९३), 'मुक्तिबोधांचे साहित्य चिंतन : एक विचार समुचित', जाफेमा प्रकाशन

१०) शेंडे ना. रा. (१९५०), शरच्चंद्र मुक्तिबोध, युगवाणी